सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग (भरती/पदोन्नती कक्ष)

जा.क्र.मनपा/साप्रवि-भपकक्ष/१२४/२०२५ दिनांक:- १०/०९/२०२५

परिपत्रक

विषय:- पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादीमध्ये समावेश असलेल्या कर्मचारी यांना पदोन्नती नाकारणे तसेच एक पेक्षा जास्त पदांमध्ये नांव असलेल्या कर्मचारी यांनी पद निवड करणेबाबत.

संदर्भ:- दि.१०/०९/२०२५ रोजी प्रसिध्द पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादी.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमधील कार्यरत कर्मचारी यांचे पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या पदांची पदोन्नती प्रक्रीया करण्यासाठी मंजुर सेवा प्रवेशानुसार पदोन्नती साखळी सुनिश्चित करुन पदोन्नती प्रक्रीया राबविणे आवश्यक असलेने पदोन्नती साखळी तयार करुन सदर मंजुर पदोन्नती साखळीनुसार महानगरपालिकेच्या दि. १ जानेवारी, २०२५ रोजीच्या सेवाजेष्ठता यादीनुसार विविध संवर्गातील संभाव्य उपलब्ध पदे पदोन्नतीने भरण्यासाठी पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील कर्मचारी यांची यादी दि. दि. १०/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादीमध्ये समावेश असलेल्या कर्मचारी यांना पदोन्नती नकारावयाची आहे, असे कर्मचारी तसेच ज्या कर्मचारी यांचे पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादीमध्ये एकापेक्षा जास्त पदांमध्ये पदोन्नतीकरीता नांवाचा समावेश आहे, अशा कर्मचारी यांनी पदोन्नतीच्या एका पदाची निवड करुन तसे लेखी पत्राद्वारे सा.प्र.वि. भरती/पदोन्नती कक्षाकडे तात्काळ दि. ११/०९/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत कळविण्याचे आहे.

वरीलप्रमाणे पदोन्नतीस नकार देण्याऱ्या कर्मचारी यांना पदोन्नतीच्या पदाचा कार्यभार स्विकारण्यापुर्वी पदोन्नती नाकारल्यास त्यांचेबाबत क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ३०३/का.१२, दि. १२/०९/२०१६ रोजीचा शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे तरतुद आहे.

- जे अधिकारी/कर्मचारी यांचा पहिल्यावेळेस पदोन्नती नाकारल्यानंतर ३ वर्षानंतर दुसऱ्यावेळेस निवडसुचीकरीता विचार करण्यात आल्यानंतर व संबंधीत अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरल्यास, मात्र संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी पुन्हा पदोन्नतीस नकार दिल्यास त्याचा त्या निवडसुचीतील व पुढील दोन वर्षांच्या निवडसुचीत विचार करण्यात येणार नाही.
- पदोन्नती नाकारलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ दिले असल्यास ते काढून घेण्यासंदर्भात वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.
- पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्यानंतर पदोन्नती नाकारता येणार नाही.

सबब ज्यांना पदोन्नती नकारावयाची आहे, त्यांचे लेखी पत्र मुदतीत प्राप्त न झालेस पुढील प्रक्रीया करण्यात येईल तसेच एकापेक्षा जास्त पदांमध्ये पदोन्नतीकरीता नांवाचा समावेश असलेल्या कर्मचारी यांनी पदोन्नतीच्या एका पदाची निवड करणेसाठीचे लेखी पत्र मुदतीत प्राप्त न झालेस त्यांचे पदोन्नतीच्या पदाबाबत समितीचा निर्णय अंतिम राहील, याची नोंद घ्यावी.

(विनायक शिंदे)
सहाय्यक आयुक्त, सा.प्र.वि.-भरती/पदोन्नती कक्ष
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

प्रति,
सर्व अधिकारी/कर्मचारी

२/- सर्व विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक तुमचे अधिनस्त कर्मचारी यांचे निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned with OKEN Scanner